लोकमत

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
## पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची सुचना

वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील मौजे भापूर ता. रिसोड व मौजे हिवरपेन ता. रिसोड येथील एकूण ०२ रेतीघाटांचा जाहीर लोकसुनावणी घेण्याचा प्रस्ताव जिल्हा खनिकर्म अधिकारी, वाशिम यांचेकडून प्राप्त झालेला आहे.

भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र.एस.ओ. १५३३, दि.१४/०९/२००६ (दि.०१/१२/२००९ सुधारीत) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टीका-टिप्पणी, अभिप्राय तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

सदर प्रकल्पांच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सूचना, टीका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरूपात नोंदविता येतील. लेखी स्वरूपात सूचना ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्यावर किंवा या कार्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात यावेत.

**उप-प्रादेशिक कार्यालय, अमरावती-२,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी,**
**अमरावती-४४४६०६. दूरध्वनी क्र. ०७२१-२५६३५९२/९३/९४**
**ई-मेल- sroamravati2@mpcb.gov.in**

तसेच मौखिक अथवा लेखी स्वरूपातील सूचना, टीका-टिप्पणी किंवा आक्षेप जाहीर जनसुनावणीच्या वेळेस सुद्धा नोंदविता येईल. जाहीर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

**जनसुनावणी तारीख : २४/१२/२०२४**

**जनसुनावणीची वेळ : दुपारी १२:०० वाजता**

**जनसुनावणीचे ठिकाणी : जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय,वाशिम**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तऐवज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत सदर दस्तऐवज अभ्यासु शकतील.

(१) जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम (२)जिल्हा परिषद कार्यालय, वाशिम. (३)जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, वाशिम. (४) उप-विभागीय कार्यालय, वाशिम ता.जि. वाशिम. (५) तहसिल कार्यालय, रिसोड जि. वाशिम.(६) ग्रामपंचायत कार्यालय, मौजे-भापूर, मौजे हिवरपेन ता. रिसोड जि. वाशिम (७)प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी, अमरावती- ४४४६०६. (८) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी, अमरावती-४४४६०६. (९) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉइंट, ३ रा व ४ था मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२ (१०) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई (११) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, तळमजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाइन्स, नागपूर- ४४०००१.

(सदरील जाहीरात मा.जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या मान्यतेने प्रसिद्ध करण्यात येत आहे.)

**स्वाक्षरीत/-**
**समन्वयक, पर्यावरणविषयक जनसुनावणी**
**तथा**
**उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, अमरावती-२**